# SNDT Women's University

1, NathibaiThakersey Road, Mumbai -20

# M.A. (Marathi) Syllabus

Academic Year – 2020-21

## Course: M.A. Marathi

Faculty: Humanities

Total Semesters: Four (4)

## Credits

Total Credits: 80

(Per semester): 20

# SNDT Women's University

1, NathibaiThackersey Road, Mumbai- 400020

## M. A.MARATHI
## Programme Structure
## 2020-2021

Faculty Name: Humanities
Name of the Programme: M. A.
Total Credits: 80

**Eligibility:**
A student is being eligible for admission to M.A. programme as per the eligibility norms prescribed by the university.

**General Information:**

- The M. A. programme is of 80 credits. There are five courses per semester. Each course will be of 4 credits. Each semester is of 20 credits. (5 x 4 = 20 Credits)
- For the M. A., courses are classified into Core (compulsory) Courses, Elective (optional) courses and CBCS (Choice Based Credit System) courses.
- In Semester I, and Semester II, students have to study total five courses in each semester.
- In Semester III, if student selects 'Research Component' as elective course, then she has to complete 2 courses of Research Component i.e. total 8 credits.
- In semester IV, if student selects 'Internship Component' as elective course, then she has to complete 2 courses of Internship Component i.e. total 8 credits.
- Students from any disciplines can opt for CBCS courses.
- In semester I, II, III and IV, students have an option to choose CBCS course each of 4 credits.

**Evaluation:**

- For the subject Marathi, each course will have 25% Internal Evaluation and 75% External Evaluation.
- Minimum 40% marks are required in Internal & External assessment separately for passing in each Course.
- Student needs to clear internal assessment to be eligible to appear for semester end (external) examination.

**Programme Specific Outcomes (PSOs):**

1. Enriching linguistic skills
2. Gain a detailed knowledge of Marathi literature
3. Understanding Indian literature through Marathi language
4. Aware of women's writing and its contribution to Marathi and Indian literature
5. Prepare for Government and private jobs
6. Enable to lead a self-reliant lifestyle

7. Get ready for research work and be aware about Research skills

## Syllabus Format

**Semester 1**

| Sr. no. | Code no. | Subjects | L | Cr. | P/T | D | TP ( E ) | Inter nal | P/V | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्यअभ्यासपत्रिका | | | | | | | | |
| 1 | | साहित्यविचार – १ | 4 | 4 | -- | 2.5 | 75 | 25 | -- | 100 |
| 2 | | भाषाविज्ञान | 4 | 4 | -- | 2.5 | 75 | 25 | -- | 100 |
| 3 | | आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास | 4 | 4 | -- | 2.5 | 75 | 25 | -- | 100 |
| | | पर्यायीअभ्यासपत्रिका ( खालीलपैकी कोणतीही एक) | | | | | | | | |
| 4-A | | मराठी लोकसाहित्य | 4 | 4 | -- | 2.5 | 75 | 25 | -- | 100 |
| 4-B | | मराठी ललित गद्य | 4 | 4 | -- | 2.5 | 75 | 25 | -- | 100 |
| | | पर्यायीअभ्यासपत्रिका ( CBCS) ( खालीलपैकी कोणतीही एक) | | | | | | | | |
| 5-A | | मराठी स्त्रीसाहित्य | 4 | 4 | -- | 2.5 | 75 | 25 | -- | 100 |
| 5-B | | सर्जनशील लेखन | 4 | 4 | -- | 2.5 | 75 | 25 | -- | 100 |

**Semester 2**

| Sr. no. | Code no. | Subjects | L | Cr. | P/T | D | TP ( E ) | Inter nal | P/V | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्यअभ्यासपत्रिका | | | | | | | | |
| 1 | | साहित्यविचार – २ | 4 | 4 | -- | 2.5 | 75 | 25 | -- | 100 |
| 2 | | संशोधनशास्त्र | 4 | 4 | -- | 2.5 | 75 | 25 | -- | 100 |
| 3 | | आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास ( कथात्म साहित्य ) | 4 | 4 | -- | 2.5 | 75 | 25 | -- | 100 |
| | | पर्यायीअभ्यासपत्रिका ( खालीलपैकी कोणतीही एक) | | | | | | | | |
| 4-A | | मराठीवैचारिकसाहित्य | 4 | 4 | -- | 2.5 | 75 | 25 | -- | 100 |
| 4-B | | भाषांतरित साहित्य | 4 | 4 | -- | 2.5 | 75 | 25 | -- | 100 |
| | | पर्यायीअभ्यासपत्रिका ( CBCS) ( खालीलपैकी कोणतीही एक) | | | | | | | | |
| 5-A | | स्त्रीवादआणि स्त्रीवादी समीक्षा | 4 | 4 | -- | 2.5 | 75 | 25 | -- | 100 |
| 5-B | | साहित्याचे अध्यापन | 4 | 4 | -- | 2.5 | 75 | 25 | -- | 100 |

**L = No. of Lectures / week, Cr. = Credits, P/T = Practical / Tutorial in hrs., D = Duration of Theory paper for Examination in hrs., TP (E) = Theory paper for Examination marks, Internal = Internal Assessment in marks, P / V = Practical / Viva Voce – marks, T = Total.**

# सत्र – १

## मराठी विभाग

### मराठी अभ्यासक्रम (नवीन)

२०२० –२०२१

एम्. ए. भाग १ / सत्र १

**अनिवार्य अभ्यासपत्रिका**

## अभ्यासपत्रिका क्र. १: १ साहित्यविचार – १

**उद्दिष्टे –** १) संस्कृत साहित्यशास्त्रातील साहित्याच्या भाषेचा विचार समजून घेणे.
२) संस्कृत साहित्यशास्त्रातील महत्त्वाच्या सिद्धांतांचा परिचय करून घेणे.
३) संस्कृत भाषेतील साहित्यविचाराची समकालीन प्रस्तुतता लक्षात घेणे.

**अभ्यास घटक –** १) शब्दशक्तिविचार
२) वक्रोक्तिसिद्धांत व रीतिसिद्धांत
३) रससिद्धांत
४) ध्वनिसिद्धांत व औचित्यसिद्धांत

| क्र. | अभ्यास घटकांचे विवरण | श्रेयांक | तासिका | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | अ) भाषेतील शब्द व अर्थ यांचे साहचर्य, शब्दशक्तिविचाराचा परिचय<br>आ) अभिधा – स्वरूप व प्रकार<br>इ) लक्षणा– स्वरूप व प्रकार<br>ई) व्यंजना– स्वरूप व प्रकार<br>उ) शब्दशक्तींचे महत्त्व | १ | १५ | २५ |
| २ | अ) कुन्तकाची वक्रोक्तिविषयक कारिका व तिचे स्पष्टीकरण<br>आ) कुन्तकाचा भाषाविचार<br>इ) वामनाचीरीतिविषयक व्याख्या व तिचे स्पष्टीकरण<br>ई) शब्दगुण व अर्थगुण – संकल्पना व प्रकार<br>उ) वामनाचा भाषाविचार | १ | १५ | २५ |
| ३ | अ) भरताचे रससूत्र व त्याचे स्पष्टीकरण – विभाव, अनुभाव व व्यभिचारी भाव या संकल्पना व त्यांचे प्रकार<br>आ) स्थायी भाव व त्यानुसार रसांची विभागणी, रससंख्या<br>इ) रसविषयक ४ उपपत्ती – भट्टलोल्लट, शंकुक, भट्टतौत, अभिनवगुप्त<br>ई) साधारणीकरण, महारसाची संकल्पना, रसविघ्ने<br>उ) करुणरसमीमांसा | १ | १५ | २५ |
| ४ | अ) ध्वनीची संकल्पना – आनंदवर्धन व अभिनवगुप्त यांचा विचार<br>आ) ध्वनीचे प्रकार (लौकिक आणि अलौकिक)<br>इ) ध्वनिविचार व व्यंजनाविचार<br>ई) रस आणि ध्वनी<br>उ) औचित्यसिद्धांत | १ | १५ | २५ |
| | एकूण | ४ | ६० | १०० |

अंतर्गत परीक्षापद्धती –१) २५गुणांच्या दोन परीक्षा घेणे आवश्यक आहे. त्यांच्या गुणांची सरासरी काढून ते अंतर्गत परीक्षेचे गुण मानावे.
२) या विषयाची अंतर्गत परीक्षा घेताना प्रकल्प / वर्गपरीक्षा / लघुप्रकल्प याच्याप्रमाणेच वस्तुनिष्ठ परीक्षापद्धतीचाही समावेश करणे आवश्यक आहे.

**संदर्भसाहित्य** –
१) भारतीय साहित्यशास्त्र – ग. त्र्यं. देशपांडे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६३
२) काव्यशास्त्रप्रदीप– स. रा. गाडगीळ, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७१
३) रसचर्चा– पद्माकर दादेगावकर
४) अभिनव काव्यप्रकाश – रा. श्री. जोग, आ. ३, पुणे १९५१
५) भरतमुनींचे नाट्यशास्त्र – गोदावरी केतकर
६) संस्कृत काव्यशास्त्राची प्रस्तावना – गो. के. भट, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, १९६३
७) काव्यप्रकाश – मम्मट, भांडारकरओरिएन्टल रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे, १९५०

८) सौंदर्यशोध आणि आनंदबोध – रा. भि. जोशी, व्हीनस प्रकाशन, पुणे, आ. ३, १९६८
९) प्राचीन काव्यशास्त्र – र. पं. कंगले, मौज प्रकाशन, मुंबई, १९७४
१०) काव्यालोचन – द. के. केळकर, १९३९
११) साहित्यविचार – दि. के. बेडेकर, मुंबई, १९६४

**मराठी विभाग**
**मराठी अभ्यासक्रम (नवीन)**
**२०२० –२०२१**
**एम्. ए. भाग १ / सत्र १**

**अनिवार्य अभ्यासपत्रिका**

## मराठी अभ्यासपत्रिका क्र. १: २ भाषाविज्ञान

**उद्दिष्टे** – १) भाषाविज्ञानया अभ्यासक्षेत्राची व्याप्ती जाणून घेणे.
२) आधुनिक भाषाविज्ञानाची भूमिका व स्वरूप समजून घेणे.
३) ध्वनिविचार, स्वनविचार, रूपविचार,रचनावअर्थविचार यांचा अभ्यास करणे.

**अभ्यास घटक** – १) आधुनिक भाषाविज्ञान : भूमिका व स्वरूप
२) ध्वनींचे वर्गीकरण वस्वनविचार
३) रूपविचार वरचना

४) अर्थविचार

| क्र. | अभ्यास घटकांचे विवरण | श्रेयांक | तासिका | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | ऊ) मानवीभाषेचे स्वरूप<br>ऋ) भाषाविज्ञान या अभ्यासक्षेत्राचे स्वरूप, व्याकरण व भाषाविज्ञान – साम्यभेद,<br>ऌ) फर्डिनंड द सस्युर यांचा भाषाविचार (एककालिक व कालक्रमिक भाषाभ्यास, भाषिक वर्तन (Parole) व भाषिक व्यवस्था (Langue), भाषिक चिन्हांचे<br>स्वरूप)<br>ऍ) नॉम चॉम्स्की यांचा भाषाविचार (भाषिक प्रयोग (Performance) वभाषिक<br>क्षमता (competence), रचनांतरणवादी निर्देशनात्म व्याकरण)<br>ऐ) अमेरिकन संरचनावादी विचार | १ | १५ | २५ |
| २ | ऊ) मानवी भाषेतील ध्वनींचे स्वरूप, मानवी वागयंत्राचे स्वरूप<br>ऋ) ध्वनींचे उच्चारणस्थान व उच्चारण-प्रयत्न यांनुसार केले जाणारे वर्गीकरण व त्यानुसार होणारे ध्वनींचे प्रकार.ध्वनींचे भाषेतील कार्य<br>ऌ) स्वन – स्वनांतर – स्वनिम या संकल्पनांचे स्पष्टीकरण<br>ऍ) स्वनिमाची व्याख्या, स्वनिमाचे स्वरूप व प्रकार ( खंडित व खंडिताधिष्ठितस्वनिम / खंडिताधिष्ठितस्वनिमांचे प्रकार), मराठीचे स्वनिम<br>ऐ) भाषेतील स्वनिम निश्चित करण्याचेतंत्र (लघुतमांतर युग्म) व तत्त्वे ( पूरक विनियोग, व्यवच्छेदक विनियोग, वैकल्पिक विनियोग) | १ | १५ | २५ |
| ३ | ऊ) भाषिक रूप, रूपिका या संकल्पनेचे स्पष्टीकरण, रूपिकांचे प्रकार, शब्द व रूपिका परस्परसंबंध<br>ऋ) रुपिकांतर या संकल्पनेचे स्पष्टीकरण, रुपिकांतरांचे प्रकार (स्वनिमाश्रयी, रुपिमाश्रयी व शून्य), रुपिकांतरांचे रुपिमात वर्गीकरण<br>ऌ) रुपिम या संकल्पनेचे स्पष्टीकरण, रुपिमांचे प्रकार<br>ऍ) रुपिम विश्लेषणाचे तंत्र, रुपिम प्रक्रिया (योग, लोपव आदेश)<br>ऐ) रचना म्हणजे काय? रचनेचे स्तर व प्रकार (अन्तःपदप्रधान व बाह्यपदप्रधान) | १ | १५ | २५ |
| ४ | ऊ) भाषेतील अर्थाचे स्वरूप<br>ऋ) शब्दार्थविषयक सिद्धांत (निर्देशवादी, प्रतिमावादी, संकल्पनावादी)<br>ऌ) शब्दार्थाचे प्रकार<br>ऍ) रूप व अर्थ संबंध ( सरूपता, समानार्थता, अनेकार्थता, अर्थ-समावेश व विरोध)<br>ऐ) अर्थक्षेत्र संकल्पना आणिघटकविश्लेषण | १ | १५ | २५ |
| | एकूण | ४ | ६० | १०० |

अंतर्गत परीक्षापद्धती –१) २५ गुणांच्या दोन परीक्षा घेणे आवश्यक आहे. त्यांच्या गुणांची सरासरी काढून ते अंतर्गत परीक्षेचे गुण मानावे.

२) या विषयाची अंतर्गत परीक्षा घेताना प्रकल्प / वर्गपरीक्षा / लघुप्रकल्प / सादरीकरण याच्याप्रमाणेचवस्तुनिष्ठ परीक्षापद्धतीचाही समावेश करणे आवश्यक आहे.

**संदर्भसाहित्य–** १)भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक, संपा.- डॉ.स. गं. मालशे, डॉ. हे. वि. इनामदार, डॉ. अंजली सोमण, पद्मगंधा प्रकाशन, पुणे,आ.४, २०१०.

२) आधुनिकभाषाविज्ञान, संपा.- डॉ. कल्याण काळे, डॉ. अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९९
३) आधुनिकभाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, डॉ. मिलिंद मालशे, लोकवाङ्मयगृह, मुंबई, १९९५.
४) वैखरी: भाषा आणि भाषाव्यवहार, डॉ. अशोक केळकर, मुंबई, १९८३
५) ध्वनिविचार - डॉ. ना. गो. कालेलकर, मौज प्रकाशन, मुंबई, आ. २, १९८५
६) भाषा: इतिहास आणि भूगोल-डॉ. ना. गो. कालेलकर, मौज प्रकाशन, मुंबई, आ. २, १९८५
७) भाषा आणि संस्कृती - डॉ. ना. गो. कालेलकर, मौज प्रकाशन, मुंबई, आ. २, १९८५
८) अर्वाचीन मराठी - डॉ. रमेश धोंगडे, दिलीपराज प्रकाशन, पुणे,
९) मराठीचा भाषिक अभ्यास - डॉ. मु. श्री. कानडे,स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, आ. २, १९९८
१०) मराठीच्या प्रमाणभाषेचे स्वरूप - डॉ. सुहासिनी लद्दू, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, १९८३
११) शास्त्रीय मराठी व्याकरण - मो. के. दामले (संपा. कृ. श्री. अर्जुनवाडकर),

**मराठी विभाग**
**मराठी अभ्यासक्रम (नवीन)**
**२०२० -२०२१**
**एम्. ए. भाग १ / सत्र १**

## अनिवार्य अभ्यासपत्रिका

### मराठी अभ्यासपत्रिका क्र. १: ३
### आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास (अव्वल इंग्रजी काळ आणि निबंधवाङ्मय- १८१८ ते २०००)

**उद्दिष्टे** - १) आधुनिक मराठी वाङ्मयाची व्याप्ती व स्वरूप जाणून घेणे.
२) आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासाची पार्श्वभूमी व भूमिकासमजून घेणे.
३) महत्त्वाच्या वाङ्मयप्रकारांचाउदय व त्यांचीसुरुवातीचीजडणघडण यांचा अभ्यास करणे.
४) मराठी निबंधवाङ्मयाची परंपरा अभ्यासणे.

**अभ्यास घटक** - १) अव्वल इंग्रजी काळ आणि प्रबोधन युग
२) अव्वल इंग्रजी काळातील साहित्यनिर्मितीचे स्वरूप
३) मराठी निबंधवाङ्मयाची परंपरा - वैचारिक निबंध
४) मराठी निबंधवाङ्मयाची परंपरा - लघुनिबंध ते ललित निबंध

| क्र. | अभ्यास घटकांचे विवरण | श्रेयांक | तासिका | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | अ) अव्वल इंग्रजी कालखंड, प्रबोधन युगाची सुरुवात<br>आ) महत्त्वाचे राजकीय बदल व महत्त्वाच्या घडामोडी | १ | १५ | २५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | इ) इंग्रजांचेशैक्षणिक धोरण, शैक्षणिक संस्था व उदारमतवादाचा प्रभाव<br>ई) महत्त्वाचेसामाजिक बदल व महत्त्वाच्या सामाजिक सुधारणा<br>उ) धर्मसुधारणेचे प्रयत्न व संस्थांचा उदय | | | |
| २ | अ) अव्वल इंग्रजी काळातील साहित्यनिर्मिती आणि पुस्तकनिर्मिती यांचे स्वरूप<br>आ) शालेय पाठ्यपुस्तके व व्याकरण ग्रंथ<br>इ) कोशवाङ्मय<br>ई) नियतकालिकांची सुरुवात व त्यांचे कार्य<br>उ) भाषांतरित साहित्य | १ | १५ | २५ |
| ३ | अ) वैचारिक निबंधवाङ्मयाची सुरुवात वजडणघडण<br>आ) वैचारिक निबंधवाङ्मयाची ठळक वैशिष्ट्ये व कार्य<br>इ) सुरुवातीचे निबंध लेखन – महत्त्वाच्या निबंधकारांचास्थूल परिचय – विष्णुबुवा ब्रह्मचारी / लोकहितवादी / महात्मा जोतीबा फुले<br>ई) निबंध्कारांची दुसरी पिढी – महत्त्वाच्या निबंधकारांचास्थूल परिचय – विष्णुशास्त्री चिपळूणकर / गो. ग. आगरकर/ लोकमान्य टिळक<br>उ) वेगळ्यावाटा– महत्त्वाच्या निबंधकारांचास्थूल परिचय – शि. म. परांजपे / न. चिं. केळकर | १ | १५ | २५ |
| ४ | अ) लघुनिबंधाची सुरुवात व स्वरूप( पर्सनल एसेचा प्रभाव)– गुजगोष्ट– ना. सी. फडके<br>आ) लघुनिबंधाचीवाटचाल – महत्त्वाच्या निबंधकारांचास्थूल परिचय – अनंत काणेकर / गो. वि. करंदीकर<br>इ) ललितनिबंधाची सुरुवात व स्वरूप– कुसुमावती देशपांडे<br>ई) ललितनिबंधाची वाटचाल – महत्त्वाच्या निबंधकारांचास्थूल परिचय – इरावती कर्वे / दुर्गा भागवत / श्री. वि. कुलकर्णी/ प्रकाश संत | १ | १५ | २५ |
| | एकूण | ४ | ६० | १०० |

अंतर्गत परीक्षापद्धती –१) २५ गुणांच्या दोन परीक्षा घेणे आवश्यक आहे. त्यांच्या गुणांची सरासरी काढून ते अंतर्गत परीक्षेचे गुण मानावे.

२) या विषयाची अंतर्गत परीक्षा घेताना प्रकल्प / वर्गपरीक्षा / लघुप्रकल्प / सादरीकरण इ. स्वरुपात घ्यावी.

**संदर्भसाहित्य–** १) मराठी वाङ्मयाचा इतिहास, संपा. रा. ग. जाधव, म. सा. प., पुणे

२) प्रदक्षिणा ( खंड १ व २ ), संपा. जयंत वष्ट. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

३) मराठी साहित्य: प्रेरणा व स्वरूप, संपा. हातकणंगलेकर/ पवार, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

४) लघुनिबंध ते मुक्त गद्य, वि. शं. चौघुले

५) साहित्य: अध्यापन व प्रकार, संपा. श्री. पु. भागवत, मौज प्रकाशन, मुंबई

६) वाङ्मयप्रकार: संकल्पना व स्वरूप, संपा. वासकर आनंद, अन्वय प्रकाशन, पुणे

**मराठी विभाग**

**मराठी अभ्यासक्रम (नवीन)**

२०२० –२०२१

**एम्. ए. भाग १ / सत्र १**

## पर्यायी अभ्यासपत्रिका

## मराठी अभ्यासपत्रिका क्र. १: ४ – अ–मराठी लोकसाहित्य

**उद्दिष्टे** – १) मराठी लोकसाहित्याचे स्वरूप जाणून घेणे.
२) मराठी लोकसाहित्य आणि लोककला यांची वैशिष्ट्येसमजून घेणे.
३) लोककथा, लोकगीत, लोकनाट्ययांचा अभ्यास करणे.
४) लोकसाहित्याच्याअभ्यासपद्धती माहीत करून घेणे

**अभ्यास घटक** – १) लोकसाहित्याची संकल्पना
२) मराठीलोकाविष्काराची प्रमुख रूपे
३) मराठी लोकनाट्याचे ठळक प्रकार
४) लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धती

| क्र. | अभ्यास घटकांचे विवरण | श्रेयांक | तासिका | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | अ) लोकसाहित्य, लोकविद्या या संज्ञाचा परिचय.लोकसाहित्याची लक्षणे<br>आ) लोकसाहित्यातील लोक, लोकसंस्कृतीआणि ठळक प्रवृत्ती<br>इ) लोकसाहित्यातील मिथके, आदिबंध आणि आदिप्रतिमा<br>ई) लोकसाहित्य व ललित साहित्य यातील साम्यभेद | १ | १५ | २५ |
| २ | अ) मराठीलोकसाहित्याचा परिचय.<br>आ) मराठी लोकगीतांचे स्वरूप व प्रकार<br>इ) मराठी लोककथा : स्वरूप व प्रकार<br>ई) मराठीलोकसाहित्यातील स्त्रियांचे कार्य | १ | १५ | २५ |
| ३ | अ) मराठीलोकनाट्याचे स्वरूप: लोकनाट्य, विधिनाट्य व नाट्यविधी | १ | १५ | २५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आ) दशावतार : स्वरूप व वैशिष्ट्ये<br>इ) तमाशा : स्वरूप व वैशिष्ट्ये<br>ई) गोंधळ व जागरण - स्वरूप व वैशिष्ट्ये | | | |
| ४ | अ) लोकसाहित्याचे संकलन, अभ्यास व संशोधन<br>आ) लोकसाहित्याचा अभ्यास- संप्रदाय व पद्धती ( भाषाशास्त्रीय / निसर्गरूपकवादी/ भ्रांतकल्पनावादी/ हेतुकथावादी)<br>इ) लोकसाहित्याविषयीचा भारतमूलक सिद्धांत<br>ई) लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धती - कार्यान्वयी/ संदर्भान्वयी / आंतरसांस्कृतिक/ लोकसांस्कृतिक | १ | १५ | २५ |
| | एकूण | ४ | ६० | १०० |

अंतर्गत परीक्षापद्धती –१) २५ गुणांच्या दोन परीक्षा घेणे आवश्यक आहे. त्यांच्या गुणांची सरासरी काढून ते अंतर्गत परीक्षेचे गुण मानावे.

२) या विषयाची अंतर्गत परीक्षा घेताना प्रकल्प / वर्गपरीक्षा / लघुप्रकल्प / सादरीकरण इ. स्वरुपात घ्यावी.

**संदर्भसाहित्य-**

१) लोकसाहित्याचे स्वरूप, प्रभाकर मांडे, परिमल प्रकाशन, औरंगाबाद.
२) लोकसाहित्याचे अंत:प्रवाह, प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद.
३) लोकनागर रंगभूमी, तारा भवाळकर, सविता प्रकाशन, औरंगाबाद
४) लोकसाहित्याची रूपरेखा, दुर्गा भागवत,
५) लोकसाहित्यातील स्त्रीप्रतिमा, तारा भवाळकर, सुगावा प्रकाशन, पुणे
६) मराठी लोककथा : स्वरूपमीमांसा, वैदेही कोळेकर, १९८७, सविता प्रकाशन, औरंगाबाद
७) समीक्षा संज्ञा कोश ( वाङ्मय कोश खंड ४ ) संपा. विजया राजाध्यक्ष व इतर, म.रा.सा.सं.मंडळ, मुंबई

## किंवा

**मराठी विभाग**
**मराठी अभ्यासक्रम (नवीन)**
**२०२० –२०२१**
**एम्. ए. भाग १ / सत्र १**

**पर्यायी अभ्यासपत्रिका**

## मराठी अभ्यासपत्रिका क्र. १: ४ – ब – मराठी ललित गद्य

**उद्दिष्टे** –
१) मराठी ललितगद्याचे स्वरूप जाणून घेणे.
२) मराठी ललितगद्याचीपरंपरा अभ्यासणे
३) ललितगद्याच्या ठळक प्रकारांचाअभ्यास करणे.
४) नेमलेल्या साहित्यकृतींच्या आधाराने ललितगद्याच्या ठळक प्रकारांची वैशिष्ट्ये अभ्यासणे

**अभ्यास घटक** – १) ललितगद्याचे स्वरूपव प्रकार. मराठी ललितगद्याचीपरंपरा

२) प्रवासवर्णन– *वंगचित्रे* – पु. ल. देशपांडे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद

३)आत्मकथन –*मौनराग*– महेश एलकुंचवार, मौज प्रकाशन, मुंबई

४) ललित निबंध – *ऋतुचक्र* – दुर्गा भागवत, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

| क्र. | अभ्यास घटकांचे विवरण | श्रेयांक | तासिका | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | अ) ललितगद्याचे स्वरूप, अन्य साहित्यप्रकारांपेक्षा वेगळेपण<br>आ) ललितगद्यातील वास्तवाचे व सत्याचे स्वरूप, ललितगद्यातील मी आणि आत्मपरतेचेमहत्त्व<br>इ) ललितगद्याचेप्रमुखप्रकार ( ललित निबंध, आत्मकथन,व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णन)<br>ई) मराठी ललितगद्याचीपरंपरा | १ | १५ | २५ |
| २ | अ) प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराचेस्वरूप, वैशिष्ट्येव प्रकार<br>आ) मराठीतील प्रवासवर्णनपर लेखनाची परंपरा<br>इ) *वंगचित्रे*मधील अनुभवविश्वाचे स्वरूप<br>ई) *वंगचित्रे*या प्रवासवर्णनाचे वाङ्मयीन विशेष | १ | १५ | २५ |
| ३ | अ) आत्मकथन या साहित्यप्रकाराचे स्वरूप, वैशिष्ट्येव प्रकार<br>आ) मराठीतीलआत्मकथनपर लेखनाची परंपरा<br>इ) *मौनराग* मधीलअनुभवविश्वाचे स्वरूप<br>ई) *मौनराग*ची वाङ्मयीन वैशिष्ट्ये | १ | १५ | २५ |
| ४ | अ) ललितनिबंध या साहित्यप्रकाराचेस्वरूप, वैशिष्ट्येव प्रकार<br>आ) मराठीलललितनिबंधाची वाटचाल<br>इ) *ऋतुचक्र*मधील अनुभवविश्वाचे स्वरूप<br>ई) *ऋतुचक्र*मधील लेखनाची वाङ्मयीन वैशिष्ट्ये | १ | १५ | २५ |
| | एकूण | ४ | ६० | १०० |

अंतर्गत परीक्षापद्धती –१) २५ गुणांच्या दोन परीक्षा घेणे आवश्यक आहे. त्यांच्या गुणांची सरासरी काढून ते अंतर्गत परीक्षेचे गुण मानावे.

२)या विषयाची अंतर्गत परीक्षा घेताना प्रकल्प / वर्गपरीक्षा / लघुप्रकल्प / सादरीकरण

इ. स्वरुपात घ्यावी.

**संदर्भसाहित्य-** १) मराठी वाङ्मयाचा इतिहास, संपा. रा. ग. जाधव, म. सा. प., पुणे

२) प्रदक्षिणा ( खंड १ व २ ), संपा. जयंत वष्ट. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

३) मराठी साहित्य: प्रेरणा व स्वरूप, संपा. हातकणंगलेकर/ पवार, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

४) लघुनिबंध ते मुक्त गद्य, वि. शं. चौघुले

**५)** प्रवासवर्णन: एक वाङ्मयप्रकार, वसंत सावंत

६) साहित्य: अध्यापन व प्रकार, संपा. श्री. पु. भागवत, मौज प्रकाशन, मुंबई

७) वाङ्मयप्रकार: संकल्पना व स्वरूप, संपा. वासकर आनंद, अन्वय प्रकाशन, पुणे

**मराठी विभाग**
**मराठी अभ्यासक्रम (नवीन)**
**२०२० –२०२१**
**एम्. ए. भाग १ / सत्र १**

**पर्यायी अभ्यासपत्रिका (CBCS)**

## मराठी अभ्यासपत्रिका क्र. १: ५ – अ – मराठी स्त्रीसाहित्य

**उद्दिष्टे** – १) मराठी स्त्रीसाहित्याचे स्वरूप जाणून घेणे.
२) मराठी स्त्रीसाहित्याची परंपरा अभ्यासणे.
३) मराठी स्त्रीसाहित्यातील बदलत्या जाणिवा समजून घेणे.
४) नेमलेल्या साहित्यकृतींच्या आधारे मराठी स्त्रीसाहित्याचीवैशिष्ट्ये अभ्यासणे.

**अभ्यास घटक** –
१) मध्ययुगीन मराठी स्त्रीसाहित्याची परंपरा
२) आधुनिकमराठी स्त्रीसाहित्याची परंपरा
३) *संत जनाबाई (चरित्र व काव्य)* –संपा. चिटणीस व कार्यकारिणी, श्री संत जनाबाई शिक्षण संस्था, गंगाखेड, अनमोल प्रकाशन, पुणे
४) *आंधळयांच्या गाई* – मेघना पेठे, राजहंस प्रकाशन, पुणे

| **क्र.** | **अभ्यास घटकांचे विवरण** | **श्रेयांक** | **तासिका** | **गुण** |
|---|---|---|---|---|
| १ | अ) मध्ययुगीन मराठी स्त्रीसाहित्यामागील प्रेरणा<br>आ) मध्ययुगीन मराठी स्त्रीसाहित्यामधून प्रकट होणारे स्त्रीजीवनाचे पैलू<br>इ) मध्ययुगीन मराठी स्त्रीसाहित्यातील स्त्रीजाणिवेचे स्वरूप<br>ई) मध्ययुगीन मराठी स्त्रीसाहित्याचे स्वरूप व वेगळेपण | १ | १५ | २५ |
| २ | आधुनिकमराठीस्त्रीसाहित्य – स्वातंत्र्यपूर्व काळ<br>अ) स्वातंत्र्यपूर्वकाळातीलस्त्रीसाहित्यामागील प्रेरणा, स्त्रीसाहित्यामधून प्रकट होणारे स्त्रीजीवनाचे पैलू, स्त्रीजाणिवेचे स्वरूप<br>आ) या काळातील मराठी स्त्रीसाहित्याचे स्वरूप व वेगळेपण<br>आधुनिकमराठीस्त्रीसाहित्य – स्वातंत्र्योत्तर काळ<br>इ) स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीसाहित्यामधून प्रकट होणारे स्त्रीजीवनाचे पैलू<br>ई) स्त्रीवादाच्या प्रभावामुळे या काळातील मराठी स्त्रीसाहित्यातील बदललेल्या स्त्रीप्रतिमेचे स्वरूप व वेगळेपण | १ | १५ | २५ |
| ३ | ***संत जनाबाई***<br>अ) *जनाबाईच्या अभंगां*मधून व्यक्त होणारे मध्ययुगीन काळातील<br>आ) स्त्रीजीवनाचे पैलू<br>इ) *जनाबाईच्या अभंगां*मागील विविधप्रेरणा व स्त्रीमनाचे दर्शन<br>ई) *जनाबाईच्या अभंगां*मधून व्यक्त होणारी स्त्रीजाणीव<br>उ) *जनाबाईच्या अभंगां*चे स्वरूप व वेगळेपण | १ | १५ | २५ |
| ४ | ***आंधळयांच्या गाई* – मेघना पेठे**<br>अ) *आंधळयांच्या गाई*मधून व्यक्त होणारे आधुनिक महानगरी-जगातील स्त्रीजीवनाचे पैलू | १ | १५ | २५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आ) *आंधळयांच्या गाई*मधून व्यक्त होणारी आधुनिक स्त्रीचीजाणीव<br>इ) *आंधळयांच्या गाई*मधून व्यक्त होणारी स्त्रीवादी आशयसूत्रे<br>ई) *आंधळयांच्या गाई*मधील स्त्रीप्रतिमेचे व भाषेचे वेगळेपण | | | |
| | एकूण | ४ | ६० | १०० |

अंतर्गत परीक्षापद्धती –१) २५ गुणांच्या दोन परीक्षा घेणे आवश्यक आहे. त्यांच्या गुणांची सरासरी काढून ते अंतर्गत परीक्षेचे गुण मानावे.
२) या विषयाची अंतर्गत परीक्षा घेताना प्रकल्प / वर्गपरीक्षा / लघुप्रकल्प / सादरीकरण इ. स्वरुपात घ्यावी.

**संदर्भसाहित्य-** १) स्त्रीसाहित्याचा मागोवा ( खंड १ ते ४ ), संपा. मंद खांडगे व इतर, साहित्यप्रेमी भगिनीमंडळ, पुणे
२) अर्धे आकाश, अश्विनी धोंगडे, दिलीपraj प्रकाशन, पुणे
३) संत कवयित्री – इंदुमती शेवडे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
४) मराठी लेखिका : चिंतन व चिंता, भालचंद्र फडके
५) लोकसाहित्यातील स्त्रीप्रतिमा, तारा भवाळकर
६) मराठी वाङ्मयाचा इतिहास, संपा. रा. ग. जाधव,म. सा. प., पुणे
७) स्त्रीलिखित मराठी कादंबरी, संपा. अरुणा ढेरे, २०१३, पद्मगंधा प्रकाशन, पुणे
८) स्त्रीलिखित मराठी कथा, संपा. अरुणा ढेरे, २०१४, पद्मगंधा प्रकाशन, पुणे
९) १९८० नंतरचे स्त्री-निर्मित कथनपर साहित्य, संपा. पुष्पलताराजापुरे-तापस, २०१०, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

# किंवा

**मराठी विभाग**
**मराठी अभ्यासक्रम (नवीन)**
**२०२० –२०२१**
**एम्. ए. भाग १ / सत्र १**

**पर्यायी अभ्यासपत्रिका (CBCS)**

## मराठी अभ्यासपत्रिका क्र. १ः ५ – ब– सर्जनशील लेखन

**उद्दिष्टे** – १) साहित्याच्या निर्मितीप्रक्रियेचे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न करणे
२) निर्मितीप्रक्रियेचे स्वरूप समजून घेण्यासाठी साहित्यप्रकार अभ्यासणे
३) निर्मितीप्रक्रियेचा अनुभव घेणे
४) स्वत: लेखन करून साहित्यनिर्मिती करणे

**अभ्यास घटक** – १) कथनात्मसाहित्याचे स्वरूप
२) कविता म्हणजे काय?
३) नाटक या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप
४) प्रत्यक्ष लेखनानुभव

| **क्र.** | **अभ्यास घटकांचे विवरण** | **श्रेयांक** | **तासिका** | **गुण** |
|---|---|---|---|---|
| १ | अ) कथनात्मसाहित्याची संकल्पना<br>आ) कथनात्मसाहित्याचे स्वरूप<br>इ) कथानकाची रचना,पात्रचित्रणाच्या पद्धती<br>ई) कथनपद्धती व भाषा | १ | १५ | २५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | अ) कवितेची संकल्पना<br>आ) कवितेतील शब्द व अर्थ यांचे साहचर्य, शब्दक्रमाचे महत्त्व<br>इ) अल्पाक्षरत्व,अलंकरण व प्रतिमासृष्टी<br>ई) नादमयता आणि लयबद्धता यांचे स्वरूप | १ | १५ | २५ |
| ३ | अ) नाटक या वाङ्मयप्रकाराचे दृक्श्राव्य स्वरूप<br>आ) नाटकातील द्वन्द्वात्मकता आणि नाटकाचा आकृतिबंध<br>इ) पात्रचित्रणाच्या पद्धती व संवादभाषा<br>ई) नाटक :संहिता व प्रयोग | १ | १५ | २५ |
| ४ | **लेखन – १- कथनात्म साहित्य**<br>अ) कथाबीजाचा विस्तार करणे<br>आ) पात्रांचे स्वभावरेखाटन करण्याचे कौशल्य आत्मसात करणे<br>इ) निवेदनाच्या पद्धती आत्मसात करणे<br>ई) भाषेचा व शैलीचा तोल सांभाळणे<br>**लेखन – २- कविता**<br>अ) काव्यबीजाचे अंकुरण ( विशिष्टप्रात्यक्षिकासाठी)<br>आ) कल्पनाविस्तार<br>इ) शब्दक्रम, नाद, लय यांचे प्रतिबिंब लेखनात कसे उमटते ते बघणे<br>ई) प्रतिमांमधून अभिव्यक्ती कशी होते ते अनुभवणे<br>**लेखन – ३ – नाटक**<br>अ) नाट्यबीजाचे नाट्यरूप फुलवणे<br>आ) कथेचा प्लॉट तयार करणे<br>इ) पात्रचित्रणाचे कौशल्य आत्मसात करणे<br>ई) संवादाचे मध्यम वापरून नाट्यवस्तूला आकार देणे<br>उ) रंगभूमीवरील सादरीकरणाच्या मर्यादा लक्षात घेणे<br>(लेखनाचे प्रात्यक्षिक घेतले जाईल. तयार झालेल्या संहितांचे वाचन व गुणदोषांची चर्चा करून पुनर्लेखन करून घेतले जाईल.) | १ | १५ | २५ |
| | एकूण | ४ | ६० | १०० |

अंतर्गत परीक्षापद्धती –१) २५ गुणांच्या दोन परीक्षा घेणे आवश्यक आहे. त्यांच्या गुणांची सरासरी काढून ते अंतर्गत परीक्षेचे गुण मानावे.

२) या विषयाची अंतर्गत परीक्षा घेताना एका परीक्षेतप्रत्यक्ष लेखनाचे कौशल्य लक्षात घ्यावे.वएक परीक्षा संकल्पनात्मक भागावर घ्यावी

३) या विषयाची बहि:स्थ परीक्षा संकल्पनात्मक भागावर होईल.

**संदर्भसाहित्य–** १) मराठी वाङ्मयाचा इतिहास, संपा. रा. ग. जाधव, म. सा. प., पुणे

२) प्रदक्षिणा ( खंड १ व २ ), संपा. जयंत वष्ट. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

३) मराठी साहित्य: प्रेरणा व स्वरूप, संपा. हातकणंगलेकर/ पवार, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

४) कादंबरीविषयी, हरिश्चंद्र थोरात, २००६, पद्मगंधा प्रकाशन, पुणे

५) कवितेचा शोध, वसंत पाटणकर,२०११, मौज प्रकाशन, मुंबई

६) साहित्य: अध्यापन व प्रकार, संपा. श्री. पु. भागवत, मौज प्रकाशन वपॉप्युलर प्रकाशन, मुंबई

७) वाङ्मयप्रकार: संकल्पना व स्वरूप, संपा. वासकर आनंद, अन्वय प्रकाशन, पुणे

# सत्र – २

**मराठी विभाग**

**मराठी अभ्यासक्रम (नवीन)**

२०२० –२०२१

**एम्. ए. भाग १ / सत्र २**

**अनिवार्य अभ्यासपत्रिका**

## अभ्यासपत्रिका क्र. २: १ साहित्यविचार – २

**उद्दिष्टे –** १) पाश्चात्यसाहित्यविचारातील महत्त्वाच्या सिद्धांतांचा परिचय करून घेणे.
२) पाश्चात्य साहित्यविचारातीलविविध संकल्पना समजूनघेणे.
३) पाश्चात्य साहित्यविचारातीलविविधभूमिकाव त्यांची प्रस्तुतता लक्षात घेणे.
४) मराठीतील महत्त्वाच्या साहित्यविषयक संकल्पना अभ्यासणे

**अभ्यास घटक** – १) साहित्याचे स्वरूप
२) साहित्याचीनिर्मिती– कल्पनाशक्तीचे कार्य
३) लौकिकतावादी व अलौकिकतावादी भूमिका
४) मराठीतील साहित्यविषयक संकल्पना

| क्र. | अभ्यास घटकांचे विवरण | श्रेयांक | तासिका | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | अ) अनुकृती सिद्धांत - प्लेटोची मांडणी<br>आ) अनुकृती सिद्धांत - ॲरिस्टॉटलचीभूमिका<br>इ) ॲरिस्टॉटलची वाङ्मयीन घाटाची कल्पना / आदि-मध्य व अंत या संकल्पना<br>ई) साहित्याचा रूपबंध | १ | १५ | २५ |
| २ | अ) साहित्याच्या निर्मितीप्रक्रियेमागीलरूपस्फुरण (चमत्कृती), स्फूर्ती यांचे कार्य<br>आ) प्रतिभाशक्तीचेस्वरूप व कार्य<br>इ) साहित्याच्या निर्मितीप्रक्रियेमधील कल्पनाशक्तीचे स्थान व कल्पनाशक्तीचे प्रकार<br>ई) साहित्याच्या निर्मितीप्रक्रियेविषयीचाकांटचा विचार | १ | १५ | २५ |
| ३ | अ) प्लेटोचानीतिविचार<br>आ) ॲरिस्टॉटलची कॅथार्सिसविषयकभूमिका<br>इ) प्रेरणासंतुलन- आय. ए. रिचर्डस<br>ई) लौकिकतावादी व अलौकिकतावादी भूमिका | १ | १५ | २५ |
| ४ | अ) विदाग्धता ( ह. ना. आपटे) / सविकल्प समाधी ( न. चिं. केळकर)<br>आ) बा. सी.मर्ढेकरांचा लयसिद्धांत<br>इ) भावनानिष्ठ समतानता आणि आत्मनिष्ठा-मर्ढेकरांचा विचार<br>ई) पोत - द. ग. गोडसे/ मानुषतेचे तत्त्व - शरच्चंद्र मुक्तिबोध | १ | १५ | २५ |
| | एकूण | ४ | ६० | १०० |

अंतर्गत परीक्षापद्धती –१) २५ गुणांच्या दोन परीक्षा घेणे आवश्यक आहे. त्यांच्या गुणांची सरासरी काढून ते अंतर्गत परीक्षेचे गुण मानावे.

२) या विषयाची अंतर्गत परीक्षा घेताना प्रकल्प / वर्गपरीक्षा / लघुप्रकल्प याच्याप्रमाणेच वस्तुनिष्ठ परीक्षापद्धतीचाही समावेश करणे आवश्यक आहे.

**संदर्भसाहित्य –**

१) सौंदर्यमीमांसा, रा. भा. पाटणकर, मौज प्रकाशन, मुंबई.
२) कांटची सौंदर्यमीमांसा, रा. भा. पाटणकर, मौज प्रकाशन, मुंबई.
३) सौंदर्य आणि साहित्य, बा. सी. मर्ढेकर, मौज प्रकाशन, मुंबई.
४) सृष्टी, साहित्य आणि सौंदर्यमूल्य, शरच्चंद्र मुक्तिबोध, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
५) सौंदर्यानुभव, प्रभाकर पाध्ये, मौज प्रकाशन, मुंबई.
६) निवडक मराठी समीक्षा, संपा.- पवार/ हातकणंगलेकर, १९९९, साहित्य अकादमी, नवी दिल्ली
७) ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र, गो. वि. करंदीकर, १९७८, मौज प्रकाशन, मुंबई
८) साहित्यशास्त्र: स्वरूप आणि समस्या, वसंत पाटणकर, २००६, पद्मगंधा प्रकाशन, पुणे
९) पोत, द. ग. गोडसे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

मराठी विभाग
मराठी अभ्यासक्रम (नवीन)
२०२० –२०२१
एम्. ए. भाग १ / सत्र 2

## अनिवार्य अभ्यासपत्रिका

## अभ्यासपत्रिका क्र. २: २संशोधनशास्त्र

**उद्दिष्टे –** १) संशोधनप्रक्रियेचे स्वरूप आणि व्याप्ती यांचे आकलन करून घेणे..
२) संशोधनप्रक्रियेची सर्व अंगोपांगे समजून घेणे.
३) साहित्यसंशोधनाच्या विविध पद्धती जाणून घेणे
४) संशोधन आणि प्रबंधलेखन करण्याची क्षमता मिळवणे,

**अभ्यास घटक –** १) संशोधन संकल्पना
२) संशोधनाची साधने
३) साहित्याचे संशोधन
४) मराठीतीलसंशोधन परंपरा

| क्र. | अभ्यास घटकांचे विवरण | श्रेयांक | तासिका | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | अ) संशोधनाचे स्वरूप : व्याख्या, प्रेरणा, गृहीतकृत्य, निष्कर्ष<br>आ) संशोधनप्रक्रियेतील टप्पे- विषयनिश्चिती, अभ्युपगम निश्चिती, संशोधन आराखडा<br>इ) संशोधनाचे प्रकार – वैज्ञानिक संशोधन, सामाजिक शास्त्रांमधीलसंशोधन, साहित्यसंशोधन<br>ई) माहितीचे संकलन करण्याच्यापद्धती, वर्गीकरणेव विश्लेषण | १ | १५ | २५ |
| २ | अ) पूर्वसंशोधनाचा आढावा व खंडन-मंडन<br>आ) ग्रंथालयीन साधने, पुठ्ठीकांचा वापर | १ | १५ | २५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | इ) प्रश्नावली, मुलाखती, सर्वेक्षण, ध्वनिमुद्रण, चित्रीकरणइत्यादी<br>ई) आवश्यकतेनुसार साधनांची निर्मिती | | | |
| ३ | अ) साहित्यसंशोधन–स्वरूप व व्याप्ती<br>आ) आंतरविद्याशाखीय ज्ञानदृष्टी व साहित्यसंशोधन<br>इ) मध्ययुगीन साहित्याचे संशोहन<br>ई) शोधनिबंधाची/ प्रबंधाची लेखनपद्धती | १ | १५ | २५ |
| ४ | अ) मराठीतील साहित्यसंशोधनाची परंपरा<br>आ) महत्त्वाचे संशोधक - अ. का. प्रियोळकर, गं. ब. ग्रामोपाध्ये<br>इ) मराठीतील मध्ययुगीन साहित्याच्या संशोधनाची परंपरा<br>ई) महत्त्वाचे संशोधक - वि. भि. कोलते, म. रा. जोशी | १ | १५ | २५ |
| | एकूण | ४ | ६० | १०० |

अंतर्गत परीक्षापद्धती –१) २५ गुणांच्या दोन परीक्षा घेणे आवश्यक आहे. त्यांच्या गुणांची सरासरी काढून ते अंतर्गत परीक्षेचे गुण मानावे.

२) या विषयाची अंतर्गत परीक्षा घेताना प्रकल्प / वर्गपरीक्षा / लघुप्रकल्प याच्याप्रमाणेच वस्तुनिष्ठ परीक्षापद्धतीचाही समावेश करणे आवश्यक आहे.

**संदर्भसाहित्य** -

१) भाषा आणि साहित्य संशोधन, संपा. वसंत जोशी खंड १, १९८१, म.सा.प. पुणे
२) .भाषा आणि साहित्य संशोधन, संपा. वसंत जोशी खंड२, १९८१, म.सा.प. पुणे
३) भाषा आणि साहित्य संशोधन, संपा. वसंत जोशी खंड३, १९८१, म.सा.प. पुणे
४) संशोधन सिद्धांत आणि पद्धती, सदा कऱ्हाडे, १९९७, लोकवाङ्मय गृह, मुंबई
५) संहिता समीक्षा आणि पारिभाषिक संज्ञा, वसंत दावतर, म.रा.सा. सं. मंडळ, मुंबई
६) मराठी संशोधनविद्या उषा देशमुख, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
७) शोधनिबंधाचीलेखनपद्धती, मिलिंद मालशे १९७९ म. सा. प., पुणे
८) तपोनिधी, संपा. भारती निरगुडकर, २०१९, पॉप्युलर प्रकाशन, पुणे

``

**मराठी विभाग**

**मराठी अभ्यासक्रम (नवीन)**

२०२० –२०२१

**एम्. ए. भाग १ / सत्र 2**

## अनिवार्य अभ्यासपत्रिका

**अभ्यासपत्रिका क्र. २: ३ आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास : कथात्म साहित्य (१८७४ ते २०००)**

**उद्दिष्टे –** १) मराठी कथा वाङ्मयाची परंपरा अभ्यासणे
२) मराठी कथेच्या वाटचालीतील ठळक टप्पे समजून घेणे.
३) मराठी कादंबरीचा उद्गम आणि जडणघडण अभ्यासणे
४) मराठी कादंबरीमागील प्रेरणा आणि मराठी कादंबरीचेप्रकार लक्षात घेणे.

**अभ्यास घटक –** १) मराठी कथेची परंपरा ( प्रारंभ ते १९४०)
२) नवकथा वनंतरची कथा
३) मराठी कादंबरीची वाटचाल ( प्रारंभ ते १९५०)
४) स्वातंत्र्योत्तरकादंबरी

| क्र. | अभ्यास घटकांचे विवरण | श्रेयांक | तासिका | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | अ) प्रारंभीचे कथालेखन – स्फुटगोष्ट – ह. ना. आपटे/ संपूर्ण गोष्ट – वि. सी.गुर्जर, काशीबाई कानिटकर<br>आ) लघुकथेची सुरुवात – दिवाकर कृष्ण<br>इ) तंत्रप्रधान कथा – ना. सी. फडके, वि. स. खांडेकर<br>ई) नवकथापूर्व कथा – दिवाकर कृष्ण, विभावरी शिरुरकर, वामन चोरघडे, कुसुमावती देशपांडे | १ | १५ | २५ |
| २ | अ) नवकथा – गाडगीळ, गोखले, भावे, माडगुळकर<br>आ) नवकथेनंतरची कथा – जी.ए.कुलकर्णी, चिं.त्र्य खानोलकर, कमाल देसाई, विजया राजाध्यक्ष<br>इ) दीर्घकथा – भारतसासणे<br>ई) दलित व ग्रामीण कथा | १ | १५ | २५ |
| ३ | अ) प्रारंभीचे कादंबरीलेखन – सामाजिक कादंबरी – ह. ना. आपटे<br>आ) वामन मल्हार, केतकर, ना, ह, आपटे, विभावरी शिरुरकर<br>इ) रंजनप्रधान कादंबरी – मुक्तामाला/ फडके, खांडेकर, माडखोलकर<br>ई) ऐतिहासिक कादंबरी – हरिभाऊ, नाथमाधवते रणजीत देसाई | १ | १५ | २५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | अ) नवकादंबरी – मर्ढेकर, नेमाडे, भाऊ पाध्ये<br>आ) दलित कादंबरी<br>इ) ग्रामीण कादंबरी<br>ई) स्त्री कादंबरीकार | १ | १५ | २५ |
| | एकूण | ४ | ६० | १०० |

अंतर्गत परीक्षापद्धती –१) २५ गुणांच्या दोन परीक्षा घेणे आवश्यक आहे. त्यांच्या गुणांची सरासरी काढून ते अंतर्गत परीक्षेचे गुण मानावे.

२) या विषयाची अंतर्गत परीक्षा घेताना प्रकल्प / वर्गपरीक्षा / लघुप्रकल्प याच्याप्रमाणेच वस्तुनिष्ठ परीक्षापद्धतीचाही समावेश करणे आवश्यक आहे.

**संदर्भसाहित्य** –

१) मराठी वाङ्मयाचा इतिहास, संपा. रा. ग. जाधव, म. सा. प., पुणे
२) प्रदक्षिणा ( खंड १ व २ ), संपा. जयंत वष्ट. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
३) मराठी साहित्य: प्रेरणा व स्वरूप, संपा. हातकणंगलेकर/ पवार, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
४) मराठी कादंबरी : पहिले शतक, कुसुमावती देशपांडे
५) मराठी कथा : उद्गम व विकास – इंदुमती शेवडे
६) अवलोकन, दिगंबर पाध्ये, २०१२, लोकवाङ्मय गृह, मुंबई
७) कादंबरीविषयी, हरिश्चंद्र थोरात, २००६, पद्मगंधा प्रकाशन, पुणे
८) खडक आणि पाणी, गंगाधर गाडगीळ,
९) मराठी कादंबरी– आस्वाद यात्रा, संपा. विजया राजाध्यक्ष, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
१०) मराठी कादंबरी : परंपरा आणि चिकित्सा, संपा. सलालकर/ बोपचे, २०१९, विजय प्रकाशन, नागपूर

**मराठी विभाग**
**मराठी अभ्यासक्रम (नवीन)**
२०२० –२०२१
**एम्. ए. भाग १ / सत्र 2**

**पर्यायी अभ्यासपत्रिका**

## मराठी अभ्यासपत्रिका क्र. २: ४ – अ –मराठी वैचारिक साहित्य

**उद्दिष्टे** –
१) मराठी वैचारिक साहित्याची परंपरा अभ्यासणे
२) वैचारिक साहित्याची लक्षणेसमजून घेणे.
३) मराठी वैचारिक साहित्याच्या प्रकारांचा अभ्यास करणे.
४) नेमलेल्या पुस्तकांच्या आधारे मराठीवैचारिक साहित्याचीवैशिष्ट्येमाहीत करून घेणे

**अभ्यास घटक** –
१) वैचारिक साहित्याचे स्वरूप
२) शेतकऱ्याचाअसूड– महात्मा जोतीबा फुले
३) निवडक विठ्ठल रामजी शिंदे – विठ्ठल रामजी शिंदे ( संपा. गो. मा. पवार)
४) मनस्विनीचं चिंतन – मालती बेडेकर

| **क्र.** | **अभ्यास घटकांचे विवरण** | **श्रेयांक** | **तासिका** | **गुण** |
|---|---|---|---|---|
| १ | अ) वैचारिक साहित्याची संकल्पना व स्वरूप विशेष ( विचार व तथ्ये यांची वस्तुनिष्ठमांडणी, पूर्वमतांचेखंडन वामंडन, तार्किकता, युक्तिवाद, सुस्पष्ट भाषाशैली इत्यादी. )<br>आ) वैचारिक साहित्याचे प्रकार – वैचारिक निबंध / संशोधनपर लेखन / समीक्षात्मक लेखन / शास्त्रीय लेखन<br>इ) वैचारिक साहित्य आणि ललित साहित्य– परस्परसंबंध<br>ई) वैचारिक साहित्यातील मी चेस्वरूप | १ | १५ | २५ |
| २ | अ) शेतकऱ्याचाअसूड मधील विचारांचे स्वरूप<br>आ) शेतकऱ्याचाअसूड मधील समाजदर्शन<br>इ) शेतकऱ्याचाअसूड मधून जाणवणारी जीवनदृष्टी<br>ई) शेतकऱ्याचाअसूड मधील भाषा व शैली | १ | १५ | २५ |
| ३ | अ) निवडक वि. रा. शिंदेया संग्रहातील वैचारिक लेखनाचे स्वरूप<br>आ) या संग्रहातील समाजदर्शनव जीवनदृष्टी<br>इ) वि. रा. शिंदेया संग्रहातील वैचारिक लेखनामागील अध्यात्मिक जाणीव<br>ई) निवडक वि. रा. शिंदेया संग्रहातीलभाषेचे व शैलीचे स्वरूप | १ | १५ | २५ |
| ४ | अ) मनस्विनीचं चिंतनमधील विचारविश्व<br>आ) मनस्विनीचं चिंतन मधील वैचारिक लेखनाचे वेगळे स्वरूप<br>इ) मनस्विनीचं चिंतन मधील जेन्डरविषयक मांडणी<br>ई) मनस्विनीचं चिंतन मधील भाषेचे स्वरूप | १ | १५ | २५ |
| | एकूण | ४ | ६० | १०० |

अंतर्गत परीक्षापद्धती –१) २५ गुणांच्या दोन परीक्षा घेणे आवश्यक आहे. त्यांच्या गुणांची सरासरी काढून ते अंतर्गत परीक्षेचे गुण मानावे.

२) या विषयाची अंतर्गत परीक्षा घेताना प्रकल्प / वर्गपरीक्षा / लघुप्रकल्प / सादरीकरण

इ. स्वरुपात घ्यावी.

**संदर्भसाहित्य-** १) विचार शिल्प, संपा. रा. ग. जाधव, १९७५, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे
२) प्रदक्षिणा ( खंड १ व २ ), संपा. जयंत वष्ट. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

# किंवा

**मराठी विभाग**
**मराठी अभ्यासक्रम (नवीन)**
२०२० –२०२१
**एम्. ए. भाग १ / सत्र २**

## पर्यायी अभ्यासपत्रिका

## मराठी अभ्यासपत्रिका क्र. २: ४ – ब – भाषांतरित साहित्य

**उद्दिष्टे –**
१) भाषांतर प्रक्रियेचे स्वरूप अभ्यासणे
२) भाषांतर व रुपांतर यातील भेद आणि भाषांतर प्रक्रियेतील अडचणी समजून घेणे
३) नेमलेल्या साहित्यकृतींच्या आधाराने भाषांतरित साहित्याची वैशिष्ट्ये लक्षात घेणे
४) भाषांतरित कृतींच्या मूल्यमापनाचे निकष जाणून घेणे

**अभ्यास घटक –**
१) भाषांतर प्रक्रियेचे स्वरूप
२) *अरण्यक* ( बंगाली)– विभूतिभूषण बंडोपाध्याय अनु,– शंकर बालाजी शास्त्री, साहित्य अकादमी, नवी दिल्ली
३) *तिरींछ* ( हिंदी) ले.– उदय प्रकाश अनु.– जयप्रकाश सावंत, लोकवाङ्मय गृह, मुंबई
४) *नागमंडल*( कन्नड) ले.– गिरीशकार्नाड अनु, –उमा कुलकर्णी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

| क्र. | अभ्यास घटकांचे विवरण | श्रेयांक | तासिका | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | अ) ललित साहित्याच्या भाषांतराची प्रक्रिया, भाषांतराचे प्रकार<br>आ) भाषांतर व रुपांतर यातील साम्यभेद<br>इ) ललित साहित्याच्या भाषांतरातील अडचणी – साहित्यप्रकारानुसार<br>ई) ललित साहित्याच्या भाषांतरातील अडचणी– काळ, संस्कृती, वाङ्मय | १ | १५ | २५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | परंपरा यातील भेदानुसार | | | |
| २ | अ) *अरण्यक* मधील अनुभव विश्व<br>आ) भाषांतरित कृती या दृष्टीने *अरण्यक* चे यशापयश<br>इ) *अरण्यक*मधील भाषेचे स्वरूप<br>ई) *अरण्यक* चे वाङ्मयीन विशेष | १ | १५ | २५ |
| ३ | अ) *तिरींछ* मधील अनुभव विश्व<br>उ) भाषांतरित कृती या दृष्टीने *तिरींछ*चे यशापयश<br>ऊ) *तिरींछ*मधील भाषेचे स्वरूप<br>ऋ) *तिरींछ* चे वाङ्मयीन विशेष | १ | १५ | २५ |
| ४ | उ) *नागमंडल* मधील अनुभव विश्व<br>ऊ) भाषांतरित कृती या दृष्टीने *नागमंडल* चे यशापयश<br>ऋ) *नागमंडल*मधील भाषेचे स्वरूप<br>ऌ) *नागमंडल* चे वाङ्मयीन विशेष | १ | १५ | २५ |
| | एकूण | ४ | ६० | १०० |

अंतर्गत परीक्षापद्धती –१) २५ गुणांच्या दोन परीक्षा घेणे आवश्यक आहे. त्यांच्या गुणांची सरासरी काढून ते अंतर्गत परीक्षेचे गुण मानावे.
२) या विषयाची अंतर्गत परीक्षा घेताना प्रकल्प / वर्गपरीक्षा / लघुप्रकल्प / सादरीकरण इ. स्वरुपात घ्यावी.

**संदर्भसाहित्य-** १) भाषांतरमीमांसा, संपा. काळे/ सोमण, प्रतिमा प्रकाशन, पुणे
२) तर्खडकर भाषांतर पाठमाला, संपा. चंपानेरकर, २००४, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई
३) राजा लियर, गो. वि. करंदीकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
४) भाषांतर, अशोक केळकर, मराठी विश्वकोश खंड १२, १९८५
५) आधुनिकभाषाविज्ञान : सिद्धात आणि उपयोजन, डॉ. मिलिंद मालशे, लोकवाङ्मयगृह, मुंबई, १९९५.
६) साहित्य: अध्यापन व प्रकार, संपा. श्री. पु. भागवत, मौज प्रकाशन वपॉप्युलर प्रकाशन मुंबई
७) भाषांतर, सदा कऱ्हाडे, लोकवाङ्मयगृह, मुंबई.

**मराठी विभाग**
**मराठी अभ्यासक्रम (नवीन)**
**२०२० –२०२१**
**एम्. ए. भाग १ / सत्र २**

**पर्यायी अभ्यासपत्रिका (CBCS)**

## मराठी अभ्यासपत्रिका क्र. २: ५ – अ – स्त्रीवाद आणि स्त्रीवादी समीक्षा

**उद्दिष्टे –** १) स्त्रीवाद या विचारसरणीचे स्वरूप अभ्यासणे

२) स्त्रीवादाचे प्रमुख प्रवाह समजून घेणे
३) स्त्रीवादी समीक्षा, तिचे प्रकार आणि वेगळेपण जाणून घेणे.
४) नेमलेल्या साहित्यकृतीची स्त्रीवादी समीक्षा करणे

**अभ्यास घटक –** १) स्त्रीवाद या विचारसरणीचे स्वरूप
२) स्त्रीवादाचे प्रमुख प्रवाह
३) स्त्रीवादी समीक्षा, तिचे प्रकार, जेन्डर संकल्पना
४) स्त्रीवादी समीक्षापद्धतीचे उपयोजन –

उपयोजनासाठी नेमलेली पुस्तके –*आहे हे असं आहे* – गौरी देशपांडे
*तिची कथा* – संपा, – मंगला आठल्येकर
( या संग्रहांतील कथा उपयोजनासाठी निवडाव्या, )

| **क्र.** | **अभ्यास घटकांचे विवरण** | **श्रेयांक** | **तासिका** | **गुण** |
|---|---|---|---|---|
| १ | अ) स्त्रीवाद या विचारसरणीचे स्वरूप व पार्श्वभूमी<br>आ) पितृसत्ताक समाजव्यवस्थेचे स्वरूप व स्त्रीची अभावात्मक प्रतिमा<br>इ) पितृसत्ताक समाजव्यवस्थेतील संस्थांमार्फत होणारे स्त्रीच्या अस्तित्वाचे खच्चीकरण, स्त्री-पुरुष विषमता व तिचे उदात्तीकरण<br>ई) अन्यमानवतावादी विचारसरणीपेक्षा स्त्रीवादाचे वेगळेपण | १ | १५ | २५ |
| २ | अ) उदारमतवादी स्त्रीवाद<br>आ) मार्क्सवादी स्त्रीवाद<br>इ) जहाल स्त्रीवाद<br>ई) भारतीय स्त्रीवाद | १ | १५ | २५ |
| ३ | अ) स्त्रीवादी समीक्षा पद्धतीची उद्दिष्टे<br>आ) स्त्रीवादी समीक्षा पद्धती( feminist criticism )<br>इ) स्त्रीकेंद्री समीक्षा पद्धती ( gynocritics)<br>ई) जेन्डर संकल्पना व तिचे महत्त्व | १ | १५ | २५ |
| ४ | **अ)** स्त्रीवादी समीक्षा पद्धतीचे उपयोजन करणे<br>**आ)** स्त्रीवादी आशयसूत्रांचा शोध घेणे<br>**इ)** स्त्रीप्रतीमेचे स्वरूप अभ्यासणे<br>**ई)** भाषेची वैशिष्ट्ये शोधणे | १ | १५ | २५ |
| | एकूण | ४ | ६० | १०० |

अंतर्गत परीक्षापद्धती –१) २५ गुणांच्या दोन परीक्षा घेणे आवश्यक आहे. त्यांच्या गुणांची सरासरी काढून ते अंतर्गत परीक्षेचे गुण मानावे.
२) या विषयाची अंतर्गत परीक्षा घेताना एक परीक्षा प्रकल्प / वर्गपरीक्षा / लघुप्रकल्प /
सादरीकरणइ. स्वरुपात घ्यावी. एकपरीक्षा उपयोजनावर घ्यावी.

**संदर्भसाहित्य–** १) स्त्रीवादी समीक्षा– स्वरूप आणि उपयोजन,अश्विनी धोंगडे, दिलीपराज प्रकाशन, पुणे.
२) स्त्रीवाद, संकलन– सुमती लांडे, २००७, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर
३) अर्धे आकाश,अश्विनी धोंगडे, २०१९, दिलीपराज प्रकाशन, पुणे.
४) समीक्षा – संज्ञा कोश( वाङ्मय कोश खंड ४, संपा. विजया राजाध्यक्ष व इतर, म. रा. सा. स. म. मुंबई
५) समीक्षामीमांसा, गंगाधर पाटील, २०११, मौज प्रकाशन, मुंबई

# किंवा

**मराठी विभाग**
**मराठी अभ्यासक्रम (नवीन)**
२०२० –२०२१
**एम्. ए. भाग १ / सत्र २**

**पर्यायी अभ्यासपत्रिका (CBCS)**

## मराठी अभ्यासपत्रिका क्र. २ : ५ – ब – साहित्याचेअध्यापन

**उद्दिष्टे –** १) अध्यापनाच्या प्रक्रियेचे स्वरूप व महत्त्व समजून घेणे
२) अध्यापनाच्या विविध साधनाची माहिती करून घेणे
३) साहित्याच्या अध्यापनाची कौशल्ये अवगत करून घेणे

**अभ्यास घटक –** १) अध्यापन प्रक्रियेचे स्वरूप, साहित्याच्या अध्यापनाची पूर्वतयारी
२) अध्यापनाची विविध साधने व त्यांची उपयुक्तता
३) साहित्याचे स्वरुप व अध्यापनाची कौशल्ये
४) साहित्याच्या अध्यापनाचे वेगवेगळे स्तर

| क्र. | अभ्यास घटकांचे विवरण | श्रेयांक | तासिका | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | अ) अध्यापन प्रक्रियेचे स्वरूप<br>आ) अध्यापनाच्याप्रमुख पद्धती<br>इ) साहित्याच्या अध्यापनाचे वेगळेपण<br>ई) साहित्याच्या अध्यापनाची पूर्वतयारी | १ | १५ | २५ |
| २ | अ) ग्रंथालयीन साधने<br>आ) दृक्श्राव्य साधने<br>इ) प्रत्यक्षअनुभव ( उदा. नाट्यप्रयोग)<br>ई) संगणकाचा वापर | १ | १५ | २५ |
| ३ | अ) साहित्याचे स्वरूप, अन्य अध्यापन विषयांपेक्षा वेगळेपण<br>आ) साहित्यप्रकारानुसार बदलणारे अध्यापनाचे स्वरूप<br>इ) साहित्यकृतीच्या स्वरूपानुसार अध्यापन कौशल्यांचा वापर<br>ई) उत्तम अध्यापनासाठी आवश्यक गोष्टी | १ | १५ | २५ |
| ४ | अ) पूर्व माध्यमिक स्तर<br>आ) माध्यमिक स्तर<br>इ) पदवी-पूर्व स्तर<br>ई) पदव्युत्तर स्तर<br>स्तरानुसारव्यामिश्रता व काठीण्य पातळीत होणारा फरक स्पष्ट करणे. | १ | १५ | २५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | एकूण | ४ | ६० | १०० |

अंतर्गत परीक्षापद्धती –१) २५ गुणांच्या दोन परीक्षा घेणे आवश्यक आहे. त्यांच्या गुणांची सरासरी काढून ते अंतर्गत परीक्षेचे गुण मानावे.

२) या विषयाची अंतर्गत परीक्षा घेताना प्रकल्प / वर्गपरीक्षा / लघुप्रकल्प / सादरीकरण इ. स्वरुपात घ्यावी.

**संदर्भसाहित्य–** १) साहित्यः अध्यापन व प्रकार, संपा. श्री. पु. भागवत, मौज प्रकाशन वपॉप्युलर प्रकाशन, मुंबई

२) साहित्याचे अध्यापन, वसंत दावतर

३) कौशल्याधिष्ठित अध्यापन – वासंती फडके, लोकवाङ्मय गृह, मुंबई